CMYK

**सुटीची सूचना**

दैनिक आरंभ मराठीच्या कार्यालयाला सुटी असल्याने १०, ११ व १२ मे रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही,याची वाचकांनी नोंद घ्यावी.
–संपादक,आरंभ मराठी


दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com





सावित्रीच्या लेकींची शासनाकडून १ रुपयावर बोळवण
पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 88 ■ शुक्रवार दि.9 मे 2025 ■ RNI NO-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# खरीप हंगामासाठी पिककर्ज वाटपाची प्रक्रिया सुरु

## यावर्षी खरीप आणि रब्बी हंगामात २२८० कोटी रुपये पीककर्ज देण्याचे उद्दिष्ट

**आरंभ मराठी / धाराशिव**

**खरीप हंगाम एक महिन्यावर आला असताना खरीप हंगामाची तयारी करण्यात येत आहे. पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या खरीप हंगाम आढावा बैठकीत पीक कर्जाचा मुद्दा वादग्रस्त बनला होता. दरवर्षी पिककर्ज मिळवताना शेतकऱ्यांना कसरत करावी लागते. त्यातच प्रत्येक बँकेचे नियम वेगळे असल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. यावर्षी खरीप आणि रब्बी हंगामात मिळून एकूण २२८० कोटी रुपयांचे पीक कर्ज वाटप करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले असले तरी प्रत्यक्षात साठ टक्क्यांपेक्षा अधिकचे वितरण होण्याची शक्यता कमी आहे.**

धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र दिनाला खरीप हंगाम २०२५-२६ साठी पूर्वतयारी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत बँकनिहाय खरीप पिककर्ज वाटपाचे नियोजन सादर करण्यात आले. यावेळी सर्व बँकांनी ३० जून २०२५ पर्यंत दिलेल्या लक्षांकाचे १००% कर्जवाटप पूर्ण करावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. तसेच मागील हंगामात घेतलेल्या पिककर्जाची तात्काळ वसूली करून जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांना कर्जवाटप करण्याचे निर्देशही देण्यात आले. जिल्हास्तरीय तांत्रिक समितीने मंजूर केलेल्या दरानुसारच प्राधान्याने कर्ज वाटप करावे, असेही ठरवण्यात आले. मागील तीन वर्षांपासून दिलेल्या उद्दिष्टांच्या केवळ ६० टक्के पीक कर्जाचे वितरण बँकांकडून केले जात आहे. जिल्ह्यातील सर्व बँका शेतकऱ्यांना पीककर्ज देताना टाळाटाळ करतात शिवाय किचकट नियमावली शेतकऱ्यांना दाखवून कर्ज नाकारतात अशाही तक्रार दरवेळी येतात. मागील खरीप हंगामात धाराशिव जिल्ह्यात केवळ ६० टक्के पीक कर्जाचे वितरण झाले होते. जिल्ह्यातील एकूण बँकांपैकी महाराष्ट्र ग्रामीण बँक सोडून इतर कुठल्याच बँकेने दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले नव्हते. पीक कर्जासाठी सिबीलची अट लावू नका असे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिल्यानंतरही बऱ्याच शेतकऱ्यांना सीबीलची अट दाखवून पीक कर्ज नाकारल्याने शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहिले होते.



पालकमंत्री सरनाईक यांनी यावर्षी शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वितरण करताना अडचणी निर्माण करणाऱ्या बँकांवर सक्तीने कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी यांना दिल्या आहेत. मागील वर्षी खरीप आणि रब्बी हंगामात मिळून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना १३०० कोटी रुपये पीककर्ज देण्यात आले होते. यावर्षी पीक कर्ज वितरणाची रक्कम २२८० कोटी इतकी आहे. यावर्षी ३० जून पर्यंतच शंभर टक्के पीक कर्ज वाटप करण्याच्या सूचना दिल्या असल्या तरी मागच्या वर्षी ऑगस्ट महिन्यापर्यंत पीक कर्ज वाटप करूनही केवळ ६० टक्के वाटप झाले होते. त्यातच पाच ते सहा बँकांनी एकाही शेतकऱ्याला पीक कर्ज दिले नव्हते.

### अशी आहे पिकनिहाय कर्जमर्यादा

शासनाने खरीप हंगाम २०२५-२६ साठी प्रति हेक्टरी कर्जदर निश्चित केले आहेत. त्यानुसार सोयाबीन: ७५ हजार रुपये, तुर ४८ हजार ४०० रुपये, ऊस १ लक्ष ७० हजार रुपये, उडीद/मुग २९ हजार रुपये असे दर निश्चित करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना बँकांनी या दराप्रमाणे पीक कर्ज वितरित करावे अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

### सीबीलचा अडथळा यावर्षीही असणार

कुठलीही बँक सिबील चेक केल्याशिवाय कर्जाचा पुरवठा करत नाही. मागील वर्षी राज्य शासनाने सिबील न पाहता शेतकऱ्यांना पीक कर्जाचे वितरण करावे अशा तोंडी सूचना बँकांना दिल्या होत्या. परंतु, तसे लेखी आदेश शासनाने काढले नव्हते. त्यामुळे बँकांनी शासनाचे तोंडी आदेश न पाळता सिबीलची अट कायम ठेवून कर्जवाटप केले. त्यामुळे उद्दिष्ट साध्य करता आले नाही. यावर्षीही सिबील पाहूनच कर्ज वाटप केले जाईल अशी भूमिका बँकांनी घेतल्यामुळे यावर्षीही कर्ज वाटपाचे उद्दिष्ट गाठणे शक्य होणार नाही.

### शेतकऱ्यांना कर्जाची वसुली भरण्याचे आवाहन

सर्व बँकांनी निश्चित केलेल्या वाढीव दरांनुसार पीककर्ज वितरित करावे व एकही पात्र शेतकरी वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी. ज्या शेतकऱ्यांनी खरीप २०२४-२५ मध्ये पीककर्ज घेतले आहे, त्यांनी तात्काळ आपल्या बँकेत जाऊन कर्जाची वसूली भरावी आणि वाढीव कर्जाचा लाभ घ्यावा. असे आवाहन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांनी केले आहे.

### कर्जदराचा बोर्ड दर्शनी भागात लावण्याच्या सूचना

पीक कर्ज घेताना कोणत्या पिकासाठी हेक्टरी किती कर्ज मिळते हे शेतकऱ्यांना माहिती नसते. बँकेचे कर्मचारी देखील शेतकऱ्यांना ही माहिती स्वतः होऊन देत नाहीत. त्यामुळे सर्व बँकांनी शासनाने निश्चित केलेल्या कर्जदराचा बोर्ड बँकेच्या दर्शनी भागात लावावा अशा सूचना यावर्षी देण्यात आल्या आहेत. तसेच कर्जवाटपाचे उद्दिष्ट पूर्ण न करणाऱ्या बँकेवर कारवाई करण्याचा निर्णय यावर्षी घेण्यात आला आहे.

# तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात भूसंपादनासाठी साडेपाचशे कोटींची तरतूद

## भूसंपादनासाठी ३० टक्के रक्कम खर्च करणार शासन, तातडीने कृती कार्यक्रम निश्चित करण्याची आमदार राणा पाटील यांची सूचना

**आरंभ मराठी / धाराशिव**

कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या तुळजापूर नगरीत भव्य आणि ऐतिहासिक १८६६ कोटींचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा राबविण्यात येत आहे. यासंबंधी मंदिराचे विश्वस्त,आमदार तथा 'मित्र'चे उपाध्यक्ष राणा जगजितसिंह पाटील यांनी गुरूवारी मुंबईच्या कार्यालयात तातडीची बैठक घेतली.यावेळी त्यांनी आराखडा राबविण्यासाठी कृती कार्यक्रम राबविण्याचे निर्देश यंत्रणेला दिले. या आराखड्यात भूसंपादनासाठी संबंधिताना समाधानकारक मावेजा देण्याचे सरकारचे धोरण असल्याचे सांगून आमदार पाटील म्हणाले की, सुमारे ३० टक्के रक्कम मावेजासाठी दिली जाणार आहे. ही रक्कम साडेपाचशे कोटी रुपयावर जाते.
आमदार राणा पाटील यांनी कालबद्ध कृती कार्यक्रमाची तातडीने आखणी करण्याबाबत सूचना दिल्या.प्रामुख्याने मंदिर जीर्णोध्दाराचे काम नोव्हेंबर महिन्यात सुरू करण्याचे ठरले आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा पहिला टप्प्यात भूसंपादन प्रक्रिया करण्याचे या बैठकीत ठरले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे ६ मे रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तुळजापूर विकास आराखड्यास राज्य सरकारच्या शिखर समितीकडून अंतिम मान्यता दिली होती.त्यानंतर याविषयी तातडीने मुंबईतील निर्मल भवन येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. विकास आराखड्यातील कामांना गती येण्याच्या अनुषंगाने यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. भूसंपादनासाठी प्रचलित दराच्या कैकपट मावेजा देण्याबाबतही बैठकीत प्राधान्याने चर्चा करण्यात आली. तुळजापूर शहरातील नागरिक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेवून भूसंपादन प्रक्रिया राबविली जाणार आहे. अंतिम मंजुरी देण्यात आलेल्या विकास आराखड्यात ३० टक्के आर्थिक तरतूद केवळ भूसंपादन प्रक्रियेसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांची जागा तीर्थक्षेत्र विकासासाठी संपादीत केली जाणार आहे, त्यांना समाधानकारक आणि रास्त मावेजा मिळणार आहे. सर्वांच्या सहमतीने आणि सर्वांना विश्वासात घेवूनच ही प्रक्रिया राबवली जाणार आहे. आई तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याचा व स्थानिक आर्थिक समृद्धी आणण्याचा आपला प्रयत्न




असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे. याप्रसंगी पुरातत्व विभागाचे संचालक तेजस गर्गे, जिल्हाधिकारी किर्ती कुमार पुजार, अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रकाश आहिरराव, सहाय्यक संचालक श्रीमती जया वाहणे, तहसिलदार अरविंद बोळंगे, कार्यकारी अभियंता शेषराव चव्हाण, वास्तुविशारद हेमंत पाटील आणि तांत्रिक सल्लागार श्रीमती तेजस्वीनी आफळे यांची उपस्थिती होती.

# महिलेवर लैंगिक अत्याचार

**आरंभ मराठी / तामलवाडी**

तुळजापूर तालुक्यातील एका गावातील एका ३२ वर्षीय महिलेवर दोन महिन्यापूर्वी लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. एका गावातील महिला दिनांक १९ मार्च २०२५ रोजी दुपारी दीड वाजता शेतातील घरी एकटी होती. त्यावेळी गावातील एका तरुणाने तेथे जावून बळजबरी तिच्यावर लैंगीक अत्याचार केला. घडल्या प्रकाराची कोठे वाच्यता केली तर जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. पिडीत महिलेने दिनांक ७ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम-६४, ३५१(२), ३५१(३), सह अ.जा.ज.अ.प्र. का. कलम ३ (२) (व्हिए) कायदा अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# चालकाचे नियंत्रण सुटले, भरधाव कार सेंट्रल पोल व स्कॉर्पिओला धडकून टपरीत अडकली

मुरुम :- शहरातील रवी बिअर बारसमोर गुरुवारी (दि.८) दुपारी एक अपघात घडला. मुरुम मोडकडून येणाऱ्या चारचाकी वाहनावरील चालकाचा अचानक ताबा सुटल्यामुळे वाहन थेट रस्त्याच्या मध्यभागी असलेल्या डीवायडरवरील विजेच्या खांबाला (सेंट्रल पोल) धडकले. धडक इतकी जोरदार होती की सेंट्रल पोल खाली कोसळून पडले. त्यानंतर कारने रस्ता ओलांडत समोरच्या बाजूस थांबलेल्या स्कॉर्पिओ गाडीला धडक दिली आणि शेजारी असलेल्या पान टपरीजवळ जाऊन अडकली.अपघातात कारचालकास किरकोळ दुखापत झाल्याचे समजते. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असून, घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती.स्थानिक नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, काही नागरिकांना वाहनाच्या धक्क्यामुळे हलका मुक्कामार लागला आहे. या अपघातात संबंधित वाहनांचे नुकसान झाले असून, मुरुम नगरपालिकेच्या अखत्यारीतील रस्त्यावरील सेंट्रल पोलचेही मोठे नुकसान झाले आहे. अपघातानंतर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत वाहने हटवून रस्ता मोकळा केला. अपघाताचे कारण शोधण्यासाठी अधिक तपास सुरू आहे. संबंधित यंत्रणांनी तात्काळ दखल घेऊन नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलावीत, अशी मागणी परिसरातील नागरिकांतून होत आहे.

# तुळजापूर येथे बँकेतून काढलेली रक्कम लाथ मारून हिसकावून पळवली

**आरंभ मराठी / तुळजापूर**

तुळजापूर शहरात बँकेतून काढलेली एक लाख रुपयांची रक्कम चोरट्याने लाथ मारून हिसकावून पळवून नेल्याची घटना घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की,सुनिल सुखदेव लोंढे (वय ५६ , तुळजापूर) यांनी एसबीआय बँकेतून एक लाख रुपये रक्कम काढली होती. हे पैसे बॅगमध्ये ठेवून जात असताना आरोपी बी. जिवारथीनम (रा चेन्नई, तामिळनाडू) याने दिनांक ७ मे रोजी सायंकाळी सहा वाजता विश्वनाथ कॉर्नर जवळ सुनिल लोंढे यांच्या पायावर लाथ मारुन पैशाची बॅग हिसकावून नेली. सुनिल लोंढे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०९ (४)अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# रस्त्यासह नालीचे काम बोगस, नव्याने काम करण्याचे आदेश द्या

- शिवसेना उबाठा गटाची आक्रमक भूमिका,जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन
- बाह्यवळण रस्त्यालगतचया सर्व्हिस रोड,नालीचे काम निकृ ष्ट

**आरंभ मराठी / धाराशिव**

अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असलेल्या धुळे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगतच्या सर्व्हिस रस्त्याचे व नालीचे काम एका कोवळ्या मुलाचा बळी गेल्यानंतर आणि नागरिकांच्या आक्रमक भूमिकेनंतर सुरू करण्यात आले. मात्र कामात दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या भागात करण्यात आलेल्या नालीवरील स्लॅब काही दिवसात गळून पडत आहे, तसेच रस्त्याचे कामही बोगस पद्धतीने करण्यात येत आहे. त्यामुळे कामाची पाहणी करून दर्जेदार काम करण्याचे आदेश संबंधित कंत्राटदाराला देण्यात यावेत,अशी मागणी शिवसेनेच्या (उबाठा) वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांच्या नेतृत्वाखालील शिष्ट मंडळाच्या वतीने मागणीचे निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, या सर्व्हिस रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी केलेल्या नालीवरील स्लॅब काही दिवसांतच कोसळले आहेत. अनेक ठिकाणी नालीवर मोठे भगदाड पडल्याने त्यापासून वाहनधारक, नागरिकांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. नालीवर स्लॅब टाकल्यानंतर त्यावर पुरेसे पाणी मारण्यात आले नाही. परिमाणी काही दिवसांतच स्लॅब कोसळण्याचे प्रकार सुरू आहेत. त्यामुळे हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे स्पष्ट होत आहे. या सर्व्हिस रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी नागरी वसाहती आहेत. या वसाहतीमध्ये जाण्यासाठी असलेल्या रस्त्यावर नालीचे बांधकाम करताना काही ठिकाणी डांबरी रस्त्यापासून नालीची उंची अधिक झाली आहे. त्यामुळे दुचाकी, चारचाकी वाहने घेऊन जाण्यासाठीही नागरिकांना कसरत करावी लागत आहे.शिवाय






सर्व्हिस रस्त्यालगत विजेचे खांब उभारण्यात आले आहेत. हे खांबही सरळ रेषेत नाहीत. सर्व्हिस रस्ता एकसमान नाही. काही ठिकाणी त्याची रुंदी कमी केलेली आहे. हा रस्ता सर्वच ठिकाणी ६ मीटर रुंदीचाच करावा. एकंदरित सर्व्हिस रस्ता, त्यालगतच्या नालीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असून, या सर्व्हिस रस्त्याची देखभाल करणाऱ्या संबंधित सक्षम अधिकाऱ्याला सोबत घेऊन आपण या कामाची स्वतः पाहणी करावी, उर्वरित काम थांबवावे व हे काम दर्जेदार करण्याबाबत संबंधित अधिकारी व कंत्राटदाराला आदेशित करावे. तसेच सदरील कामाची गुणवत्ता गुणनियंत्रकाकडून (क्वॉलिटी कंट्रोल) तपासावी.या सर्व्हिस रस्त्याचे व त्यालगतच्या नालीचे काम दर्जेदार नाही झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.निवेदनावर शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव, रवि वाघमारे, युवराज देशमुख,प्रदीप साळुंके, युवराज मसे,महेश शेरकर, सुहास शेरकर, बाळासाहेब जेवे, शिवाजी इंगळे, नागेश जगदाळे, बालाजी शेरकर,सागर शेरकर, बंडू पाटील, अमित शेरकर, नवनाथ शेरकर, ऋषिकेश शेरकर, अभिषेक शेरकर, अभिजीत शेरकर, सुरज शेरकर, कैलास शेरकर, हरिश्चंद्र शेरकर, सुरेश शेरकर, संपत शेरकर, सुरज शेरकर, श्रीनिवास शेरकर, ओंकार शेरकर, प्रथमेश शेरकर, अंगद शेरकर, धोंडीबा शेरकर, निजाम शेख, इब्राहिम शेख, रमेश ढवळे, राज निकम, प्रसाद तेरकर, किरण शेरकर, अनिल शेरकर, सुमित बागल आदींची स्वाक्षरीआहे.

# भारतीय डाक विभागाची ज्ञान पोस्ट नवी सेवा सुरु

## पुस्तके आणि दस्तऐवज माफक दरात पाठवण्याची सोय झाली उपलब्ध




**आरंभ मराठी / धाराशिव**

भारतीय डाक विभागाने माहिती व ज्ञान प्रसारासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत दि.१ मे २०२५ पासून ''ज्ञान पोस्ट'' या नव्या डाकसेवेची सुरुवात केली आहे. या सेवेच्या माध्यमातून ज्ञान प्रसाराचे लेखी दस्तावेज, पुस्तके, सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक साहित्य (लेखन) माफक दरात पाठवणे शक्य होणार आहे.अशी माहिती धाराशिव विभागाचे डाक अधीक्षक एस.एन.अंबेकर यांनी दिली. ज्ञान पोस्ट ही सेवा १ मे २०२५ पासून देशभरात उपलब्ध झाली असून, यामार्फत नागरिकांना सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक साहित्य तसेच पुस्तके आणि अन्य लेखी दस्तऐवज अतिशय माफक दरात पाठवता येणार आहेत. ही सेवा खास करून विद्यार्थ्यांसाठी, अभ्यासकांसाठी, लेखक आणि प्रकाशक यांच्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. डिजिटल युगातही मुद्रित साहित्याचे महत्त्व कायम आहे. पुस्तके, संशोधनपर कागदपत्रे, धार्मिक आणि सांस्कृतिक माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ''ज्ञान पोस्ट'' एक प्रभावी माध्यम ठरेल. ग्रामीण भागातील लोकांना वाचनसंस्कृतीशी जोडण्याच्या दृष्टीनेही हा उपक्रम महत्त्वाचा आहे. या उपक्रमामुळे भारतीय डाक विभागाची सेवा अधिक आधुनिक व जनोपयोगी बनणार असून, समाजाच्या सर्व थरांपर्यंत ज्ञान पोहोचवण्याचे कार्य प्रभावीपणे पार पडेल. या नव्या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी सर्व नागरिक, संस्था, शिक्षक, विद्यार्थी,लेखक आणि प्रकाशक यांनी तसेच नागरिकांनी या नव्या सुविधेचा लाभ घ्यावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

### सेवेचा उद्देश आणि महत्त्व

''ज्ञान पोस्ट'' हा टपाल विभागाच्या मेल सेवांतर्गत तयार करण्यात आलेला एक नवा उपक्रम असून, त्यामार्फत देशभर ज्ञान प्रसार साध्य करणे हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रेषकांना शैक्षणिक साहित्य व विशिष्ट प्रकारचे लिखाण डाक कार्यालयामार्फत पाठवण्याची सुलभ व विश्वासार्ह सुविधा मिळणार आहे.

### सेवेची वैशिष्ट्ये

''ज्ञान पोस्ट'' अंतर्गत खालील प्रमुख सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ऑनलाईन ट्रॅकिंग सेवा प्रेषकाला त्याची पाठवलेली वस्तू ऑनलाईन ट्रॅक व ट्रेस करण्याची सुविधा. पोस्टिंगचा पुरावा प्रत्येक बुकिंगनंतर प्रेषकाला अधिकृत पावती मिळेल. वितरणावेळी स्वाक्षरीनिशी पुरावा विनंतीनुसार वितरणाच्या वेळी प्राप्तकर्त्याची स्वाक्षरी घेऊन पुरावा दिला जाईल. भूपृष्ठ मार्गे वाहतूक या सेवेंतर्गत सर्व पार्सल्स फक्त भूपृष्ठ मार्गे ( ) पाठवले जातील. वजन मर्यादा किमान ३०० ग्रॅम आणि कमाल ५ किलोपर्यंतच्या वस्तू ''ज्ञान पोस्ट''द्वारे पाठवता येतील.

CMYK

# शौर्य आणि त्याग शिकवणारा राजा- महाराणा प्रताप



मेवाडचे महाराणा प्रतापसिंह हे नाव जगप्रसिद्ध आहे. मेवाडच्या सिंहाने अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी,मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी २५ वर्षे तहान-भूक विसरून लढा दिला. मेवाडचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात कुठेही तोड नाही. प्रतापसिंहाच्या तेजाने केवळ राजपुतानाच नव्हे तर संपूर्ण भारत प्रभावित झाला होता. त्यामुळेच प्रतापसिंहांना संपूर्ण भारतात पूज्य मानले जाते. भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंह यांना आजही मोलाचे स्थान आहे. कारण महाराणा प्रताप यांच्या नावानेच त्याकाळी मुगल घाबरत असे. त्यामुळेच भारत भुमिला महाराणा प्रतापसिंहांचा मोठा अभिमान आहे.महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० साली उत्तर दक्षिण भारतातील मेवाड येथे झाला.त्याच्या वडिलांचे नाव राणा उदयसिंह मेवाड. बुंदेलखंड आणि सिरोही वंशातील काही राजे आपला स्वाभिमान,धर्म आणि स्वतंत्रता टिकवून ठेवण्यासाठी अकबराशी प्राणपणाने लढले. पुढे उदयसिंह मेवाडचे राजा झाले. चित्तोडच्या युद्धानंतर चार वर्षांनी दिनांक ३ मार्च १५७२ ला उदयसिंहांचे निधन झाले.यानंतर मेवाडचे संपूर्ण सुत्रे महाराणा प्रतापसिंह यांच्याकडे आले व त्यांचा राज्याभिषेक झाला. ज्यांचे नाव घेतल्याने सर्वांनाच स्फुर्ती येते असे महान तेजस्वी योध्दा म्हणजे महाराणा प्रताप.महाराणा प्रतापांनी प्रतिकुल परिस्थितीतही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता मेवाडचे रक्षण केले.जयपूरचा राजा मानसिंग याने अकबरापासुन आपल्या राज्याला धोका पोहोचू नये म्हणून आपली बहीण अकबराला देऊन सोयरिक केली.अकबराने मेवाडला आपल्या अधिपत्याखाली आणण्यासाठी मानसिंहाला मेवाडला जाण्यास सांगितले.त्या निमित्ताने मानसिंग दिल्लीला जात असताना वाटेत मुद्दाम आपल्या वैभवाचे प्रदर्शन करण्याकरिता कुंभगडावर असलेल्या महाराणा प्रतापसिंह यांच्या भेटीस गेला.महाराणा प्रताप यांनी त्यांचा आदरसत्कार केला.परंतु मानसिंगच्या पंक्तीत बसून जेवण्यास नकार दिला. मानसिंहाने याचे कारण विचारले.यावर महाराणा प्रताप म्हणाले स्वतःच्या समशेरच्या बळावर आपल्या राज्याचे रक्षण करण्याऐवजी जे राजपूत आपल्या मुली-बहिणी मोगलांना देऊन त्यांच्यापासून राज्य रक्षण करतात,अशा अस्वाभिमानी राजपुतांच्या पंक्तीला मी बसत नाही. मी जर आपणासोबत जेवण केले तर बाप्पा रावळ,राणा सांगा, ह्या सारख्या थोर वंशाला काळीमा फासण्यासारखे होईल. हे ऐकून मानसिंहाच्या मनात खटकले आणि महाराणा प्रतापसिंह यांना धमकी देत म्हणाला महाराणा प्रतापसिंहजी आज आपण माझा अपमान केला ह्याचा बदला रणांगणात अवश्य घेईल व मानसिंह काय आहे हे दाखवून देईल.असे म्हणून तेथुन निघुन गेला आणि मानसिंह व महाराणा प्रतापसिंह यांच्यात कट्टर वैरत्व निर्माण झाले. ही घटना अती शिगेला पोहोचली व युध्दात रूपांतर झाली. राणाजींचे वक्तव्य नेहमीच मानसिंहाच्या मनाला खटकत होते.ही संपूर्ण घटना मानसिंहाने अकबराला सांगितली. पहिलेच मानसिंह तिलमिला झालेला होता आणि अकबराला मेवाड पाहिजे होते.याकरीता अकबर सर्वत्र जहर घोळण्याचे काम करीत होता.अशा परिस्थितीत अकबराने मानसिंहाच्या नेतृत्वाखाली दोन लाख प्रचंड सैन्य आणि अकबराचा मुलगा सलीम याला घेऊन हल्दीघाटीच्या दिशेने महाराणा प्रताप यांच्याशी युद्ध करायला निघाला.ही बातमी महाराणा प्रतापसिंह यांना कळताच त्यांनी आपले बावीस हजार सैन्य घेऊन अरवली पर्वताच्या कुंभलगड वाटेने जाणाऱ्या मानसिंहाच्या सैन्यावर बाणांनी छुपे हल्ले करून बरेचसे सैनिक धाराशाही केले. दोन लाख सैन्याशी बावीस हजार सैन्य लढा देत होते.महाराणा प्रतापसिंह यांच्या तलवारीचा वार अकबराचा मुलगा सलीमवर बसणार तितक्यात सलिमचा हत्ती हालला आणि तो तलवारीचा वार हत्तीवर बसला आणि सलिम वाचला. महाराणा प्रतापसिंहांच्या भितीने मानसिंह आपल्या सैन्यासह पिछाडीवर राहिला. हे घनघोर युद्ध अनेक दिवस चालले.राणाजी आपल्या तलवारीने वेढा कापत सामोरं जाण्याचा प्रयत्न करू लागले.महाराणा प्रतापसिंह जखमी झालेले पाहून मानसिंह अत्यंत दु:खी झाला. आपण कुठेतरी चुकत आहोत हे त्यांच्या लक्षात आले व मेवाडच्या रक्षणासाठी आपण येथुन निघून जाण्यास विनंती केली व प्रतापसिंहानी ती मान्य केली. प्रतापांचे छत्र आणि मुकुट मानसिंहाने स्वतः डोक्यात घातले.मानसिंहाला महाराणा प्रतापसिंह समजून मोगलांनी आक्रमण केले. अनेक मोगलांना त्यांनी ठार मारले व शेवटी विरगती प्राप्त झाली. तेवढ्यातच शत्रू सैनिकांनी राणाजींचा घोडा चेतक याच्या पायावर तीर सोडून वार केला.त्याचा पाय निकामी झाला.अशाही परिस्थितीत स्वामिनिष्ठ घोड्याने वेढ्याचा भेद करून व संपूर्ण वेढा चिरत दूर निघून गेला.वाटेत एक ओढा लागला चेतकने उडी घेऊन तो ओढा पार केला आणि काही दुर जाऊन चेतकने प्राण सोडला. आपला पाठलाग कोण करीत आहे हे पाहण्यासाठी राणाप्रतापांनी मागे फिरून पहिले,तर अकबराला जाऊन मिळालेला आपला धाकटा भाऊ शक्तीसिंह व त्यांच्या बरोबर चार-पाच मोगल सैनिकांना जिवे मारीत होता. राणाजी हे दृश्य पाहून अचंबित झाले.यानंतर शक्तीसिंह राणाजींजवळ आले आणि त्यांना आलिंगन देऊन म्हणाला दादा तुझ्या सारखे शौर्य आणि कणखर मन यांच्या अभावामुळे मी जरी मोगलांची सरदारकी करीत असलो तरी तूच माझा आदर्श आहे.या हल्दीघाटीच्या युद्धानंतर अकबराने महाराणा प्रतापसिंह यांच्यावर अनेक आक्रमणे केली.मात्र अकबर महाराणा प्रतापसिंह यांना पराभूत करू शकला नाही.हल्दीघाटी हे इतिहासातील सर्वात मोठे युद्ध मानले जाते. प्रतापांना हरविण्यासाठी शेवटचा उपाय म्हणून अकबराने पराक्रमी योद्धा जगन्नाथला मोठ्या सेनेसह १५८४ मध्ये मेवाडवर आक्रमक करण्यास पाठविले.परंतु २ वर्षे अथक प्रयत्न करूनही तो महाराणा प्रतापसिंह यांना पकडू शकला नाही किंवा हरवू शकला नाही.अशाप्रकारे प्रबळ महत्त्वाकांक्षी, दृढनिश्चयी, धैर्यशील, उज्वल कीर्तीवंत आणि साहसी अशा महाराणा प्रतापसिंहाला शमविण्याचा प्रयत्न अकबराने केला पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. २१ जून १५७६ रोजी चेतकने (घोड्याने) महाराणा प्रतापसिंहांना निरोप दिला.आजही हल्दीघाटी येथील राजसमंद येथे चेतकची समाधी आहे. त्याकडे पाहणारे सर्वच प्रतापांच्या मूर्तीप्रमाणेच श्रध्देने पाहतात. १९ जानेवारी १५९७ रोजी महाराणा प्रतापसिंह यांची प्राणज्योत मावळली. भारतीय इतिहासात महाराणा प्रतापसिंहाचे नाव राष्ट्र, धर्म, संस्कृती, स्वाभिमान यासाठी आजही मानाने घेतले जाते. जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकाश-पाताळ आहे तोपर्यंत प्रतापांचे नाव अमर राहील. परमप्रतापी महाराणा प्रतापसिंहांना जयंती निमित्त कोटी-कोटी प्रणाम! जय हिंद.



रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

# ज्ञान गंगेचा प्रवाह, आहे माझी कविता, कशी होते प्रवाहीत,जशी वाहाते सरिता

आरंभ मराठीच्या रसिक वाचकांना नमस्कार. आज हे काव्यारंभचे चौदावे पुष्प! हे पुष्प मी माजी प्राचार्या डॉ. सुलभा दिलीपराव देशमुख यांच्या कवितांचा रसास्वादघेऊनगुंफणारआहे.मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगरच्या सदस्य आहेत, तसेच धाराशिव येथील अक्षरवेलसाहित्य मंडळाच्या विद्यमान अध्यक्ष आहेत.डॉ. सुलभा देशमुख यांना सामाजिक व शैक्षणिक कार्यासाठी तसेच आपल्या मुलांवर उत्तम संस्कार केल्याबदल जिजाऊ पुरस्कार, आदर्श माता पुरस्कार, मातोश्री पुरस्कार,शिवाई पुरस्कार, सेवा गौरव पुरस्कार, उस्मानाबाद भुषण पुरस्कार, भारत विभुषण सन्मान पुरस्कार, नॅशनल गोल्ड स्टार अॅवार्ड, वगैरे अनेक पुरस्कारांनी सन्मानित केलेले आहे.तसेच डॉ. सुलभा देशमुख यांना वाचन व लेखनातही रुची आहे. समीक्षा लेखन, विविध विषयावर लेख प्रकाशित झालेले आहेत, तसेच त्यांना चारोळी लेखन व कविता लेखनाचाही छंद आहे. इतके दिवस प्राचार्य असल्यामुळे, कार्यबाहुल्यामुळे त्या आपल्या छंदासाठी जास्त वेळ देऊ शकत नव्हत्या पण आता निवृत्त आयुष्यात त्या पुन्हा काव्यलेखनाकडे वळल्या आहेत,यांच्या कवितां मधल्या लेकी आंम्ही सावित्रीच्याया कवितेत त्यांनी सावित्रीच्या कार्याचा गौरव केला आहे, त्या म्हणतात,तू पेटविल्या ज्ञान ज्योती, झालों आंम्ही साक्षर जागवली आमची अस्मिता, खातो सुखाची भाकर खरंच आहे, सावित्रीबाईंनी शिक्षणाची ज्योत पेटवल्यामुळेच आपण आज सुखात आहोत.तर आपल्या काय सांगु सये या कवितेत त्यांनी आपल्या माहेरचं, चार भावांचं, आणि त्यांच्या प्रेमाचं वर्णन केलं आहे, त्यासाठी अनेक उपमा दिल्या आहेत, ज्ञाना निवृत्तीची मुक्ताबाई,सोपानदेवाची बहिणाबाई, सुभद्रा बलराम असं त्या म्हणतात व शेवटी चार भावांच्या प्रेमासाठी,माय बापाच्या माघारी, चारी माया एकवटलीआईबापाच्या उणिवेची, खंत नाही कधी वाटली असं सहज लिहून जातात. तर कविता या कवितेत त्या ज्ञान गंगेचा प्रवाह, आहे माझी कविता कशी होते प्रवाहित, जशी वाहते सरिता असं आपल्या कवितेचं वर्णन करतात आणि म्हणतात की कविते, तुझ्या प्रसववेदना मी हदयात जपते. किती सुंदर कल्पना आहे कवयित्रीची!तर कवयित्रीची मी ही कविता विनोदी ढंगाची आहे, प्रत्येक स्त्रीला वाटतं मी आहे म्हणूनच आपल्या नवऱ्याचा संसार व्यवस्थित चालु आहे, यावर ही कविता आहे.अहो, मी म्हणूनच तुमचा संसार केलाही कविता वाचताना प्रत्येक स्त्रीला ती आपलीच वाटते व मनापासुन हसु येते. तर प्रतिक या कवितेत आपल्याला अभिमान वाटणारी अनेक प्रतिकं मांडली आहेत,राजे शिवाजी प्रतिक, आमच्या हिंदूधर्माचे छत्रपती, अजोड विजेते ते, हिंदवी स्वराज्य निर्मितीचे! तर अशा विविध विषयांवरच्याया कवितांचा आपणआस्वादघेऊया.



काव्यारंभ

डॉ. रेखा अनिल ढगे

## लेकी आम्ही सावित्रीच्या

लेकी आम्ही सावित्रीच्या,गातो
तुझे गुणगान
किती गावी महती, तुझा वाटतो
अभिमान
गोरी गोमटी देखणी ,टिळा भाळी
कुंकवाचा
होता हातभर पदर , निट निटस
साडीचा
शेण घेतले अंगावर , मान
ठेविला जोतिबांचा
सद्गुणी सावित्रीने, मळा
पिकविला ज्ञानाचा
..............
लेकी आम्ही सावित्रीच्या
श्वास आमचा कोंडलेला ,स्त्री
शिक्षणाची वाण
शांत डोक्याने केले काम
,पेटविले सारे रान
ज्ञानाची ती जननी, आम्ही करीतो
तिचा सन्मान
स्त्री शिक्षणाचे कार्य तिचे,
इतिहासाचे सुवर्ण पान...
लेकी आम्ही सावित्रीच्या
अंधारलेल्या समाजात,
अंधश्रद्धेचा काळा रेटा
प्रस्थापितांच्या रूढींवरती ,
फिरवला तिने वरंवटा
पायात रूतले काटे,चालवल्या
नव्या पायवाटा.
स्त्री शिक्षणाच्या पुण्याईत,तिचा
पहिलाच वाटा
लेकी आम्ही सावित्रीच्या,
कर्मठांचा मारा ,सोसल्या
अपशब्दांच्या झळा
वसा चालविला तिने,नव्हती
नेसायला चंद्रकळा
लढा नित्याने दिला,पिकविला
ज्ञानाचा मळा
अज्ञानी पिढ्यांना
लावला,तिने शिक्षणाचा लळा
..................४
लेकी आम्ही सावित्रीच्या
ज्योतिबाला बोलते ती, फाटक्या
लुगड्याला दंड
लुगडे देतो आणुनी परि, नको
करू शाळा खंड
अज्ञानी रुढी परंपरांचे ,तोडले
तिने दोरखंड
जोतिबाच्या सावित्रीची,ज्ञानज्योत
तेवते अखंड ..............५
लेकी आम्ही' सावित्रीच्या
स्त्री शिक्षणाचा वारसा, वसा
करतो साकार
जोतिबांच्या क्रांती ज्योती,तुझे
लई थोर उपकार
तु पेटविल्या ज्ञानज्योती ,झालो
आम्ही साक्षर जागवली
आमची अस्मिता
खातो सुखाची भाकर
लेकी आम्ही सावित्रीच्या गातो
तिचे गुणगान...
किती गावी महती, तुझा वाटतो
अभिमान....

## मी

मी पणाच्या गाण्याचा गाते
मी गळा
अहो !मी म्हणून तुमचा संसार
केला
काय सांगू बाई अहो लग्नानंतरचे
ते दिवस
सतत असायची की हो
आल्यागेल्याची उठबस
थकलीस का ग? कधीं
तिकडून विचारन हो नाही
की कधी प्रेमान दोन शब्द
मायेचे नाही .
अहो! सदा कदा ,रांधा वाडा
उष्टी काढा.
फक्त मोठेपणाचा हो दिखाऊ
गाडा
दिवसन् दिवस सगळा की हो
कामात गेला
अहो ! मी म्हणून तुमचा संसार
केला. ।।१।।

अहो ! ''रोज दोन तिन नाष्टे न्
चाळीस कप चहा
अहो! कुठे कांहीं कमी पडायला
भाग नाही पाहा!
सतत असायची ना हो आल्या
गेल्यांची वर्दळ
काय कराव , आमच्या ह्यांची
माया लई की हो पातळ
सरबराईतच सदा हो *हा
आला न् *तो गेला.
अहो !मी म्हणून तुमचा संसार
केला....।।२।।

कधी बाहेर फिरायला नाही की
, नाही हो कधी गजरा
लांब सहलीला जाणे हे तर
पूर्णच विसरा
अभ्यास आणि शिक्षण*न्
*सतत शाळेच्या चकरा
झोपायला वाजायचे की हो
रात्रीचे आकरा
तिकडच्या मात्र सगळ्या
आप्तेष्टांचा भारीच की हो
कळवळा
अहो !मी म्हणून तुमचा संसार
केला ....।।३।।

अहो ! कसला मेकअप अन्
कसले आलंय नटन
सतत आपल बायकोला
शब्दातच कटवणं
अहो! सदा तोंडावर बारा, अन्
यंत्रासारख हो वागणं
जळल मेल हो, ते किती
लाजीरवाणी जगणं.
अहो !सदा न् कदा घड्याळाच्या
काट्यावरती पळा
अहो!मी म्हणून तुमचा संसार
केला......।।४।।

अहो ! हे सगळं चाळीस वर्षे
थोडी नव्हे चार तप
आजकालच्या मुलीं करतातच
ना हो नवर्यालाच गप
परमेश्वराने मात्र मनापासून
आशीर्वाद मला दिला.
झाल्या सगळ्या कष्टाचा मला
विसर की हो पडला.
आई भवानीच्या कृपेचा मला
आशिर्वाद मिळाला
अहो !मी म्हणूनच बर! मी
आणि मीच तुमचा संसार
चांगलाच केला ।।५।।

## कविता

ज्ञान गंगेचा प्रवाह,
आहे माझी कविता
कशी होते प्रवाहीत
जशी वाहाते सरिता

किती मारता डुबकी
होतो भाव निर्मळ
शुद्ध शब्दांच्या मातीचे
रूपं तीचे सोज्वळ
सूर्य प्रकाश पडला
*शब्दांच्या माणिकांचं
दरवळला गंध सुगंधी
माझ्या काव्य प्रतिभेचा.

प्रवाहातून आली कविता
जशी भावानात भजलेली
दिसते मोहक रूपडे तीचे
लावण्यवती जणु लाजलेली.

थेंब गच्च ओघळले
तीच्या गुलाबी गालावरूनी
कविता सजली माझी
बघा नानाविध अलंकारांनी.

नवप्रतिभेच्या कंठात
शोभे हिरेमाणकाची सरी
रंगात खुलते , हासते
माझी कविता लाजरी.

माझ्या काव्य रचनेला
असे शोभा सृजनाची
सूर्य प्रभेसम उजळे
काया तीची कांचनाची. ७

यौवनाची तेजाळी चढे
तीच्या शब्दा शब्दातून
शब्द किणकिणती कानी
तीच्या पाचूच्या कंकणातून

माझ्या कवितेच्या नेत्री
लकाकते सौम्य अंजन
डौलदार तीची चाल
छुमछुम वाजते पैंजण

कवितेच्या कटीवर शोभतो
रत्नजडित सोन्याचा मेखला
भावबंध फुटता उरीचा
शब्द अंतरीचा दाटला
.
कविता गझल ओवीतून
माझ्या मनी डोकावताना
लोकगीत तु बनतेस कधी
स्फुरतेस , सोसतेस तु विरह
यातना-
सजवते मी तुला किती
शब्द आणि अर्थ अलंकारांनी
मोरपिसासम हळुवार शब्द
मग येती अत्तर कुपीतूनी

कागदावरती अलगद उतरवते
शब्द पाकळी उलगडते
पडझडीने बांधणी होते
प्रसव वेदना हदयी जपते

तुझ्या प्रसव वेदना मी हदयी
जपते

तूझ्या प्रसव वेदना मी हदयी
जपते

## काय सांगू सये...

काय सांगू सये.... माझ्या
बंधुराजांच कौतुक

बाप माझा हरिश्चंद्र
,सरस्वती विद्येची माय
किती गावे गुणगान,जशी
निवालेली साय

चार माझे बंधु उभे ,माझ्या
चारी बाजूनं
लहानगी मी बहिण ,जाते
प्रेमान झाकुनं

लाडकी मी बहिण ,न्हाली
प्रेम वर्षावान
माहेरपण रंगल माझं ,चार
बंधुच्या प्रेमान

शिक्षणाचा वारसा ,वसा
घेतला कष्टाचा
सर्वोच्च पदाचा म
ान,अभिमान महाराष्ट्राचा

आदराच्या भितीने ,
घातला आदर्श पिढीला
उभे भक्कम पायावर, उच्च
शिक्षण साथीला

हिमालयाची उंची ,माझ्या
बंधुरायाची ग माया
येता आठवण उर भरतो
,मोहरते माझी काया

माहेरपणाला माझ्या ,
नाही उणा कधी मुराळी
अगत्याचं आवतान
,वर्षातून येतं चार वेळी

भाऊराया माझे जसे,
वासाचे चार वेलदोडे
मनी माझ्या सांडती,
प्राजक्ताचे भरले सडे

सहा पाकळ्यांच फ
ूल,पाचवी मी पाकळी
बालपण चित्र आठवता ,
खुलते माझी कळी

ऐन्यात पाहता रूप , मी
तर त्यांची छाया
वेड्या बहिणीची ,उमजते
वेडी का ग माया

सुसंस्कारांची त्याची
वाट,धडा अजूनही गिरविते
चार बंधु प्रेमाचे अलंकार
,अंगावर मी मिरविते

बंधुराजांनी बाणली
,नितीमत्तेची शिकवण
अंगीकार कठिण , त्यांचे
मलाअसे भुषण.

साधी राहणी,उच्च विचार
,पित्याचा सुसंस्कार
अंगीकारले व्रत हे,नाही
मानली हार

मायेच्या माझ्या
भावजया,जशी तुळशीची
पानं
माहेरपणाला ग माझ्या
,नसते कशाचीच वाण


बंधुराजांच्या सहवासाला
बहिण ग व्याकुळ
देवा तुझ्या कृपेन, म
ाहेराच भरलं गोकुळ

भाऊराया माझे, चांदीच्या
चार उतरंडी सुरेख
माया अंत:करणी
तेवते,जशी कांचनाची
पारख .

बहिण मी जशी ज्ञाना
निवृत्तीची मुक्ताबाई
ओवीते शब्द जशी
सोपानाची बहिणाबाई

प्रेम वर्षावाचा मंद
गंध,सदा बंधुच्या मेळ्यात
जशी सुभद्रा बलराम
,जगन्नाथांच्या मंदिरात

माय बापाच्या म
ाघारी,चारी माया
एकवटली
आई बापांच्या उणीवेची ,
खंत नाही कधी वाटली !



डॉ.सौ.सुलभा
दिलीपराव देशमुख

## आर्थिक व्यवहारावरून जमावाची दोघांना रॉडने मारहाण

आरंभ मराठी / उमरगा

नारंगवाडी येथे आर्थिक व्यवहारावरून वाद होऊन सात जणांच्या जमावाने दोघांना लोखंडी रॉडने मारहाण केल्याची घटना घडली.आरोपी बाळु विठ्ठल कांबळे, राहुल किसन दलाले, श्रीकांत विठ्ठल कांबळे, सोनाजी बाळु कांबळे, मिनाबाई किसन दलाले, शिवम भरत कांबळे, अश्विनी शिवम कांबळे (सर्व रा. नारंगवाडी)यांनी ४ मे रोजी रात्री ११ वाजता नारंगवाडी येथे फिर्यादी संजय श्रीमंत गायकवाड यांना व त्यांचा मेहुणा अमोल कांबळे यांना हॉटेलमध्ये कामावर येण्याच्या व आर्थिक व्यवहाराच्या कारणावरुन गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ केली. तसेच लाथाबुक्यांनी, लोखंडी कत्ती, लोखंडी रॉड, काठी व दगडाने मारहाण करुन गंभीर करुन जखमी केले तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. संजय गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवला आहे.

## शेत रस्त्यासाठी आज सस्ती अदालत उपक्रम

आरंभ मराठी / भूम

शेतजमिनी मधील रस्त्यामुळे मोठ्या तक्रारी होत असल्याने शासनाने तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली ''सस्ती अदालत'' समितीचे गठन केले आहे. या समितीमध्ये शेतरस्ते पाणंद रस्ते याबाबतच्या अडचणी दूर केल्या जाणार आहेत. भूम तालुक्यातील नागरिकांनी या अदालती मध्ये सहभाग नोंदवून आपल्या अडचणी दूर कराव्यात असे आवाहन तहसीलदार जयवंत पाटील यांनी केले आहे. सस्ती अदालत प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी घेण्यात येणार असून शेतकऱ्यांच्या रस्त्याबाबत अडचणीच्या ठिकाणी प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधून समुपदेशन करून मार्ग काढण्यात येणार आहे. तहसील कार्यालयाकडे यापूर्वी शेत जमीन रस्त्याबाबत अनेक अर्ज दाखल झाले असून सदर अर्जाचा निपटारा दिनांक ९ मे रोजी सकाळी दहा वाजता सभागृहातमध्ये होणाऱ्या बैठकीत करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली आहे. सस्ती अदालतचे अध्यक्ष म्हणून तहसीलदार असणार असून, सहअध्यक्ष म्हणून गटविकास अधिकारी तर सदस्य म्हणून उपविभागीय अभियंता, वनपरिक्षेत्र अधिकारी, पोलीस निरीक्षक व नायब तहसीलदार सदस्य म्हणून काम पाहणार आहेत.

# तुळजापूर बनतेय जिल्ह्याचे राजकीय रणांगण !

## ड्रग्स प्रकरणामुळे तुळजापूरची राज्यात चर्चा, जिल्ह्याच्या भाजप नेतृत्वाला कोंडीत पकडण्यासाठी विरोधकांसह महायुतीचे नेते सरसावले







सूरज बागल / आरंभ मराठी

तुळजापूर - विधानसभा असो की लोकसभा.कोणत्याही राजकीय पक्षाच्या प्रचाराचा नारळ फुटतो तो कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या तुळजापूर नगरीतच.मात्र,हीच पवित्र नगरी गेल्या काही महिन्यापासून ड्रग्स प्रकरणामुळे चर्चेत आली आहे.या नगरीने जिल्ह्याचे राजकारण तापवले आहे. त्यामुळे तुळजापूर जिल्ह्याच्या राजकारणाचे रणांगण बनले असून, भाजपच्या जिल्हा नेतृत्वाला कोंडीत पकडण्यासाठी विरोधकांसह महायुतीचे काही नेते मैदानात उतरले आहेत.

जिल्हयातील भाजपच्या ताब्यात असलेला एकमेव तुळजापूर विधानसभा मतदार संघ सध्या जिल्हयातील राजकारणाचा केंद्र बिंदू बनुन तो राजकिय आखाडा बनला आहे. धाराशिव जिल्हयात चार विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यात शिवसेनेकडे (उबाठा) धाराशिव -कळंब व उमरगा लोहारा तर भाजपकडे तुळजापूर, शिवसेना ( शिंदे गट) भूम -परांडा मतदारसंघ आहे.तर येथील लोकसभा मतदारसंघ शिवसेना (उबाठा ) पक्षाकडे आहे.सध्या जिल्हयात प्रामुख्याने शिवसेना (उबाठा) व भाजप या दोन पक्षात टोकाची राजकीय स्पर्धा आहे. वेगवेगळ्या कारणावरून दोन्ही पक्षात प्रचंड तणाव दिसतोय. दोन्ही पक्ष एकमेकांना कोंडीत पकडण्याची एकही संधी सोडण्यास तयार नाहीत. जिल्ह्याचे भाजपचे नेतृत्व करणारे आमदार राणा जगजितसिंह पाटील तुळजापूर मतदारसंघाचे आमदार आहेत. तुळजापूर ड्रग्स प्रकरणात समोर आलेले काही आरोपी त्यांच्या पक्षाचे आणि आमदारांचे निकटवर्तीय आहेत. त्यामुळे आमदार राणा पाटील यांच्यावर टीकेची झोड उठवण्यात येत आहे. त्यांना घेण्यासाठी विरोधी पक्षाचे म्हणजेच महाविकास आघाडीचे नेते समोर आलेले असताना तुळजापुरातील काही महायुतीच्या नेत्यांनीही या प्रकरणात आक्रमक भूमिका घेतली आहे.त्यातच तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील काही मुद्द्यावरून तुळजापुरातील स्थानिक पुजारी,राजकीय नेत्यांनी असमाधान व्यक्त करत खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या माध्यमातून मंदिर प्रशासनासमोर व्यथा मांडली. तसेच याच बैठकीत खासदार ओमराजे निंबाळकर यांनी आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या भोवती संशयाचे जाळे निर्माण करत वातावरण तापविण्याचे प्रयत्न केले.त्यामुळे आधीच ड्रग्स प्रकरणावरून चर्चेत आलेले तुळजापूर आता जिल्ह्याचे राजकीय रणांगण बनले आहे.

### शिवसेनेचे लक्ष्य तुळजापूर विधानसभा

शिवसेना (उबाठा) खासदार ओमराजे निंबाळकर यांचे कट्टर विरोधक भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील असल्याने आ पाटलांना त्यांचाच मतदार संघात शह देवुन गुंतवुन ठेवण्यासाठी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी व्युहुरचना आखली असल्याचे बोलले जात आहे.त्यामुळे शिवसेना तुळजापूर तालुक्यात मोठा राजकिय भुकंप करण्याच्या तयारीत आहे.येणाऱ्या काळात राजकीय ताकद वाढवून ओमराजे निंबाळकर आमदार राणा पाटील यांना अधिक कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करतील, त्यांना स्थानिक पातळीवर साथ मिळेल, असे सांगण्यात येत आहे.

### विकास कामांपेक्षा ड्रग्स प्रकरणाचा मुद्दा चर्चेत

तुळजापूर विधानसभा मतदार संघ राज्यात सर्वाधिक चर्चा असणारा मतदार संघ मागील पाच वर्षा पासुन बनला आहे. पुर्वी हा मतदारसंघ काँग्रेसचा बालेकिल्ला होता. मात्र २०१९ नंतर तो भाजपकडे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या रुपाने गेला. त्यामुळे या मतदारसंघावर जिल्हयातील सर्वच पक्षाच्या नेत्यांचे लक्ष आहे. तिर्थक्षेत्र तुळजापूर येथे सापडलेल्या ड्रग्जच्या विरोधात विरोधकांनी तसेच सत्ताधाऱ्यांनी मात करण्यासाठी पुरेपुर वापर केला.धाराशिव जिल्हयात विरोधकांनी राणाजगजितसिंह पाटील यांना श्रीक्षेत्र तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा ड्रग्जसह अनेक प्रश्नावरुन लक्ष करुन टिकेचे झोड उठवली. याच दरम्यान साथ देण्याऐवजी त्यांच्याच भाजप पक्षातील पदाधिकाऱ्यांनीही चुप्पी साधल्याने विरोधी पक्षाने याचा पुरेपुर फायदा उठवून भाजपसह गृहमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस यांच्यावरही शरसंधान साधण्याचा प्रयत्न केला. यात मित्र पक्षांच्या काही पदाधिकाऱ्यांनी विरोधकांना साथ दिली. यामुळे भाजपने या तालुक्यात हजारो कोटी रुपयांच्या सुरु केलेल्या विकास कामापेक्षा भाजप आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या करण्यात आलेले आरोप वरचढ ठरले.

### ड्रग्स प्रकरणाआडून नगर परिषदेवर डोळा

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणाआडून नगरपरिषदेची सत्ता ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. तुळजापूर ही जिल्ह्यातील महत्वाची नगर परिषद आहे. तिर्थक्षेत्र असल्याने येथे कायम मोठे नेते, उद्योगपती यांची ये- जा सुरु असते.पालिकेवर पंधरा वर्षापासून आ. राणाजगजितसिंह पाटील गटाची सत्ता आहे.

# एनसीसी व करिअर कट्ट्याच्या विद्यार्थ्यांनी घेतले जलतारा खड्ड्याचे प्रशिक्षण




आरंभ मराठी/ उमरगा

उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात जलसाक्षरता कक्षाच्या वतीने तसेच एनसीसी आणि करिअर कट्टा विभागाच्या सहकार्याने जलतारा प्रकल्पा अंतर्गत जलतरा खड्डा याचे प्रशिक्षण जलदूत विद्यार्थ्यांना देण्यात आले. जलतारा जनक डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न झाली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांना जलतारा खड्डा आपल्या गावामध्ये, घरामध्ये, शेतामध्ये घेता यावा यासाठी महाविद्यालयाच्या वतीने प्रत्यक्ष जलतारा खड्ड्याचे प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी जलतारा खड्डा कसा असावा याचे मार्गदर्शन केले. यावेळी आपल्या मार्गदर्शनात त्यांनी ''जलतारा खड्डा'' घेण्याची प्रक्रिया मृदा व जलसंधारणासाठी वापरली जाते. हा खड्डा पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी उपयोगी ठरतो. जिथे पावसाचे पाणी साचते किंवा वाहते असे ठिकाण निवडावे, झाडांजवळ किंवा बागेत केल्यास अधिक फायदेशीर. सामान्यतः ५ फूट लांब, ५ फूट रुंद आणि ६ फूट खोल खड्डा घ्यावा. गरजेनुसार मोठा खड्डा देखील घेता येतो. सर्वात खाली मोठे दगड (२ फूट), त्यावर मध्यम आकाराचे गोटे (२ फूट), त्यावर गिट्टी/वाळू (२ फूट), सर्वात वर थोडीशी वाळू व माती असावी. वर्षातून एकदा खड्ड्याची साफसफाई करा.गाळ साचल्यास वरचा थर काढून पुन्हा भरावा. यामुळे भूगर्भ जलपातळी वाढवण्यासाठी व पाण्याचा साठा टिकवण्यासाठी उपयुक्त आहे. पावसाचे पाणी वाया न जाता परिसरातून वाहणारे पाणी खड्ड्यात मुरवल्यास पाणी साठवणूक होते. विहीर, हँडपंप किंवा बोअरवेल यांची जलपातळी हळूहळू वाढते. झाडांना नैसर्गिकरीत्या पाणी मिळाल्यामुळे गाव/कॉलेज ग्रीन कॅम्पस बनतो. असे प्रतिपादन करताना विद्यार्थ्यांनी प्रत्येक गावांमध्ये जनजागृती करावी आणि पाण्याची समस्या सोडवण्यास पुढाकार घ्यावा असे आवाहन केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ विलास इंगळे, प्रबंधक राजकुमार सोनवणे, एस. एस. जगताप, करिअर कट्टा आणि एनसीसीचे विद्यार्थी जलदूत उपस्थित होते.

# लोमटे महाराजांच्या समाधीसमोर हलग्या वाजवून उपोषणाला सुरुवात

## जागेचा वाद,चुकीच्या पद्धतीने फेर घेतल्याची तक्रार






आरंभ मराठी/ येरमाळा

कळंब तालुक्यातील मलकापूर येथील सुंदर लोमटे यांनी जमिनीचा फेरफार चुकीच्या पद्धतीने घेऊन वारसा हक्काने घेण्यात आलेली बेकायदेशीर नोंद रद्द करून संबंधितावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी सुंदर लोमटे यांनी गुरुवारपासून सुभाष महाराज लोमटे यांच्या समाधी मंदिरासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. त्यापुर्वी सकाळी ग्रामपंचायत कार्यालयापासून हलग्यांच्या निनादात हातात फलक घेऊन सुंदर लोमटे उपोषण स्थळी दाखल झाले.त्यांच्या या अनोख्या आंदोलनाने लक्ष वेधले आहे.मलकापूर येथील गट नंबर २६१ चा फेरफार क्रमांक ६६३ चुकीच्या पद्धतीने घेण्यात आला असून, तो रद्द करण्यात यावा म्हणून सुंदर लोमटे अनेक महिन्यापासून पाठपुरावा करत आहेत. याच मागणीच्या अनुषंगाने त्यांनी गुरुवारी मलकापूर येथे सुभाष लोमटे यांच्या समाधी मंदिरासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. याच मंदिरात सध्या अखंड हरीनाम सप्ताह सुरू आहे. त्यामुळे वाद निर्माण होण्याची शक्यता असल्याने येरमाळा पोलिसांनी या प्रकरणात लक्ष घातले आहे. सातबारा फेरफारची सर्व कागदपत्रे खोटी व बनावट असून,संबंधितावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा म्हणून वेळोवेळी निवेदन दिली. मात्र तरी देखील प्रशासनाने दखल घेतली नाही. म्हणून प्रशासनाच्या विरोधात आपले उपोषण सुरू राहील, असे सुंदर लोमटे यांनी सांगितले.

# मुरुम शहरात ऑपरेशन सिंदूरच्या यशस्वी मोहिमेनंतर विजयी जल्लोष

## माजी सैनिकांच्या उपस्थितीत शहरवासियांकडून अभिमानाचा क्षण साजरा



आरंभ मराठी / मुरुम

भारतीय सैन्य दलाने बुधवारी (दि.७) मध्यरात्री पाकिस्तानच्या नियंत्रणाखालील भागात मोठी कारवाई करत ९ दहशतवादी तळांचा यशस्वीपणे नायनाट केला. ''ऑपरेशन सिंदूर'' या धाडसी मोहिमेद्वारे भारतीय लष्कराच्या हवाई दलाने जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यातील निष्पाप मृतांना खरी श्रद्धांजली वाहिली. या ऐतिहासिक विजयामुळे संपूर्ण देशभरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून मुरुम शहरातही त्याचे प्रतिबिंब पहायला मिळाले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात बुधवारी संध्याकाळी, तमाम शहरवासीयांच्या वतीने विजयी जल्लोष साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे भारतीय माजी सैनिकांच्या गौरवपूर्ण उपस्थितीत हा सोहळा पार पडला. उपस्थित नागरिकांनी जोरदार फटाक्यांची आतषबाजी करत आनंद साजरा केला. यावेळी नागरिकांना पेढे वाटून गोड क्षण सामायिक करण्यात आला. यावेळी भगत माळी, सिद्धलिंग हिरेमठ व श्रीकांत मिनियार आदींनी मनोगते व्यक्त केले. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, ''भारतीय लष्कराने दाखवलेले शौर्य हे प्रत्येक भारतीयाच्या मनात अभिमानाची जाणीव निर्माण करणारे आहे. या मोहिमेद्वारे भारताने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्यांना कधीही क्षमा केली जाणार नाही. दहशतवाद्यांच्या तळांवर केलेली ही कारवाई म्हणजे केवळ बदल्याची नाही, तर भारताच्या सुरक्षिततेसाठी आणि भविष्यातील हल्ल्यांना आळा घालण्यासाठी अत्यंत गरजेची होती. आपले जवान सीमेवर सतत सज्ज आहेत. त्यांच्या बलिदानामुळेच आपण इथे सुरक्षित जीवन जगू शकतो. या मोहिमेतील यशामुळे संपूर्ण देशाचा आत्मविश्वास उंचावला आहे.'' कार्यक्रमात पहलगाम हल्ल्यात शहीद झालेल्या भारतीय नागरिकांनाही श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मृतीस अभिवादन करत उपस्थितांनी दोन मिनिटांचे मौन पाळले. या उत्सवामधून देशभक्तीचा ठसा उमटवत मुरुम शहराने आपल्या लष्कराच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार पुन्हा एकदा दृढ केला. यावेळी मुरुम शहर व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# कोल्हापूरच्या पणदूरकर दांपत्याची भारतीय संरक्षण निधीसाठी पाच लाखांची देणगी



आरंभ मराठी / कोल्हापूर

कोल्हापुरातील हेम किरण रामचंद्र पणदूरकर यांनी पहलगाम भ्याड अतिरेकी हल्ल्यानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीत भारतीय लष्कराचे मनोधैर्य व वित्तीय वाढ करून देण्यासाठी भारतीय राष्ट्रीय संरक्षण निधी म्हणजेच नॅशनल डिफेन्स फंड यासाठी रुपये पाच लाख एवढी देणगी दिली.पंतप्रधान कार्यालय, दिल्ली येथे रवाना करण्यासाठी डॉ. राम पणदूरकर यांच्याकडे धनादेश हस्तांतरित केला. हा धनादेश पंतप्रधान कार्यालय दिल्ली या ठिकाणी रवाना झालेला आहे. या निधीसाठी दिलेली रक्कम, अंडर सेक्रेटरी (फंडस) पीएमओ, साऊथ ब्लॉक, नवी दिल्ली अकरा येथे पाठविली. यापूर्वी पणदूरकर यांनी, शिवाजी विद्यापीठात कमवा व शिका योजनेअंतर्गत, गरीब मुलींच्या अभ्यासिकेची सोय करण्यासाठी साठ लाख रुपयांची देणगी दिली होती. त्या देणगीतून त्यांची दिवंगत कन्या रूपाली पणदूरकर या नावांनी अभ्यासिका बांधण्यात आली आहे. अभ्यासिका दुमजली आहे. ३०० विद्यार्थिनी एकावेळी अभ्यास करू शकतील, अशा प्रकारची सोय व ग्रंथालयही सुसज्ज आहे.सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी पाच लाख रुपये देणगी, विधिज्ञ, डॉक्टर रूपाली पणदूरकर स्मृतिप्रीत्यर्थ दिली आहे. यापूर्वीही पणदूरकर दांपत्याने अनेक सामाजिक संस्थांना कन्येच्या स्मृतिप्रीत्यर्थ देणग्या दिल्या आहेत. शिवाय पोस्टातील सुकन्या समृद्धी योजनेतही खाते उघडून काही लहान मुलींसाठी दरवर्षी ठराविक पैसे भरतात. शिवाजी विद्यापीठाचे माजी भूगोल विभागप्रमुख प्रा. डॉ. राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण पणदूरकर यांचे समाजातून कौतुक होत आहे.

www.arambhmarathi.com

दैनिक आरंभ मराठी

आपलं धाराशिव.... शुक्रवार दि.9मे 2025



# सावित्रीच्या लेकींची शासनाकडून १ रुपयावर बोळवण

अभिजित साळुंके / आरंभ मराठी

■ राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील मुलींना मिळतो दररोज फक्त १ रुपया प्रोत्साहन भत्ता

■ ३१ वर्षांपासून योजनेचे पैसे वाढलेच नाहीत

लोहारा -अनुसूचित जाती-जमाती व भटक्या-विमुक्त समाजातील पहिली ते चौथीपर्यंत शिकणाऱ्या मुलींसाठी सन १९९२ पासून शासनाकडून 'प्रोत्साहन उपस्थिती भत्ता देण्यात येतो. मात्र, तब्बल ३१ वर्षानंतरही या योजनेंतर्गत विद्यार्थिनींना दररोज फक्त १ रुपयाच भत्ता मिळतो आहे.

महागाईने सर्वच क्षेत्रांमध्ये उच्चांक गाठलेला असताना या भत्त्यात एक पैशाचीही वाढ झालेली नाही. त्यामुळे दिवसाला केवळ एक रुपया भत्ता देऊन शासन गोरगरीब विद्यार्थ्यांची थट्टा करत असल्याचा सूर पालकांमधून उमटत आहे. विद्यार्थिनींसाठी शाळेत उपस्थित राहण्यासाठी दिला जाणारा हा भत्ता दारिद्र्यरेषेखालील तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील अनुसूचित जाती-जमाती व भटक्या समाजातील मुलींना लागू होतो. २०21 मध्ये मंत्रिमंडळाने या भत्त्यात वाढ करून तो पाच रुपये करण्याची शिफारस केली होती. मात्र, चार वर्षांचा कालावधी उलटूनही शासनाकडून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. शिक्षण विभाग किंवा लोकप्रतिनिधी यांच्याकडूनही या विषयाकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचे दिसून येते. या योजनेचा उद्देश मुलींच्या शालेय उपस्थितीत वाढ करणे आणि त्यांना शाळेकडे आकर्षित करणे हा आहे. मात्र, महागाईच्या तुलनेत हा भत्ता सध्याच्या काळात अत्यंत अपुरा आणि नाममात्र असल्याचे चित्र आहे. जिल्हा परिषदेच्या शाळांमधील आहे. या भत्त्यात तातडीने वाढ करून विद्यार्थिनींना खऱ्या अर्थाने प्रोत्साहन देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. शासनाने सावित्रीच्या लेकींची ही थट्टा थांबवावी, अशी संतप्त प्रतिक्रिया पालकांतून व्यक्त होत आहे.






## योजना ठरत आहे औपचारिक

या योजनेला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात आले असून, त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली होती. त्यांच्याच नावाने सुरू झालेल्या या योजनेच्या माध्यमातून विद्यार्थिनींना केवळ एक रुपया देण्यात येत असल्याने ही योजना केवळ औपचारिक ठरत आहे, अशी टीका पालक आणि शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे. महिन्याला मिळणाऱ्या तीस रुपयात विद्यार्थिनींना एक वही सुद्धा घेता येत नसल्यामुळे या भत्त्याचा शालेय शिक्षणात काहीच उपयोग होत नसल्याचे चित्र आहे.

## लाभ कमी तो देखील वेळेवर मिळत नाही

या योजनेंतर्गत मिळणार लाभ अत्यंत कमी असूनही तो कधीच वेळेवर मिळत नाही. कधी सहा महिने तर कधी वर्षभर या योजनेचे पैसे विद्यार्थिनींना मिळत नाहीत. वास्तविक नियमित शाळेत येणाऱ्या मुलींना या योजनेतून मिळणाऱ्या पैशातून शालेय खर्च भागवता यावा म्हणून या योजनेची सुरुवात करण्यात आली होती. परंतु, लाभ कमी आणि तोदेखील वेळेवर मिळत नसल्याने याचा काहीच फायदा विद्यार्थिनींना होत नसल्याचे चित्र दिसत आहे.

## हा तर तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार

मुलींच्या शिक्षणासाठी दिला जाणारा एक रुपयाचा भत्ता म्हणजे केवळ 'तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार आहे. विशेष म्हणजे हा एक रुपयादेखील अनेकदा वेळेवर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. जिल्हा परिषद शाळांमधील मुलींची उपस्थिती वाढावी, यासाठी शासन दररोज एक रुपयाप्रमाणे भत्ता देते. परंतु, ३१ वर्षांमध्ये सोन्याचे भाव दोन हजार रुपये प्रति तोळ्यावरून एक लाखांवर गेले, तरी मुलींना मात्र १ रुपयाच मिळत आहे. याबाबत येणाऱ्या काळात विधानसभेत आवाज उठवला जाईल.

-प्रवीण स्वामी,आमदार

# मुरुड येथील समाज जागृती विद्यालयात पंधरा वर्षानंतर भरला माजी विद्यार्थ्यांचा दहावीचा वर्ग



आरंभ मराठी / मुरुड

मुरुड येथील समाज जागृती विद्यालयात शिकणाऱ्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा तब्बल १५ वर्षानंतर पुन्हा एकदा दहावीचा वर्ग भरवण्यात आला. स्नेह संमेलनाच्या निमित्ताने हे विद्यार्थी पुन्हा एकदा जुन्या आठवणी घेऊन भेटले. प्रारंभी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रगीत म्हणून वर्गात हजेरी घेण्यात आली. त्यानंतर गुरुजनांचा सत्कार करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक एस कदम, बालाजी जगताप, मगर, पिसाळ, कापसे, गोरे, घुटे, रोहिले, नाडे, जाधवर आदी शिक्षक उपस्थित होते. सन २००९-१० ला दहावीच्या वर्गात शिकत असलेले विद्यार्थी अचानक स्नेह संमेलनाच्या निमित्ताने १५ वर्षांनंतर एकमेकांसमोर आल्याने एकमेकांना ओळखू शकले नाहीत. शाळेतील त्याच लाकडी बाकांवर पुन्हा एकदा आपल्या आवडत्या मित्र मैत्रिणीबरोबर बसण्याची हौस प्रत्येकाने भागवून घेतली. आनंद, आश्चर्य आणि कौतुक अशा संमिश्र भावना सर्वांच्या चेहऱ्यावर दिसत होत्या. सर्व माजी विद्यार्थी विद्यार्थिनी एकत्र आल्यावर सर्वांनी आपला परिचय करून दिला. शालेय जीवनातील काही गंमतीदार आणि काही विनोदी आठवणींना उजाळा दिला. शालेय जीवनातील संस्काराचे धडे, शाळेतील मस्ती, एकत्रीतपणे केलेला अभ्यास, शिक्षकांचा विद्यार्थ्यांवरील वचक, शाळेतील क्रीडा स्पर्धा, शिक्षकांनी दिलेली शिक्षा, स्नेहसंमेलन आणि त्यातील सांस्कृतिक कार्यक्रमाची धूम अशा विविध विषयांवर माजी विद्यार्थ्यांनी गप्पा मारून जुन्या आठवणींना उजाळा दिला.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंबंधी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे समता परिषदेकडून स्वागत

आरंभ मराठी / धाराशिव

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०२२ चे ओबीसी आरक्षण कायम ठेवून घेण्यात याव्यात असा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाला धक्का न लागता या निवडणुका होणार असल्याने अखिल भारतीय समता परिषदेच्या वतीने धाराशिव शहरातील महात्मा फुले चौक येथे जल्लोष साजरा करण्यात आला. महाराष्ट्रातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणाच्या कारणावरून रखडलेल्या आहेत. या निवडणुकामध्ये २०२२ चे राजकीय आरक्षण कायम ठेवून निवडणुका घ्याव्यात यासाठी अखिल भारतीय समता परिषदेकडून सतत पाठपुरावा करण्यात येत होता. सुप्रीम कोर्टाने या प्रकरणात सन २०२२ च्या आरक्षणाप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यात याव्यात. तसेच चार आठवड्यात अधिसूचना जारी करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील ओबीसी समाजाला मोठा दिलासा मिळाला असल्याचे अखिल भारतीय समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आबासाहेब खोत म्हणाले. यावेळी महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पेढे वाटून, फटाके वाजवून जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी अखिल भारतीय समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे, जिल्हा कार्याध्यक्ष संतोष डोरले, कळंब तालुकाध्यक्ष प्रशांत वेदपाठक, धाराशिव तालुकाध्यक्ष रॉबीन बगाडे, शहराध्यक्ष व्यंकट जाधव, मनोज वाघमारे, नंदकुमार कुऱ्हाडे, भजनदास जगताप, तुळजापूर तालुकाध्यक्ष प्रदीप राऊत, शशिकांत महामुनी, महेश लोकरे, प्रवीण क्षीरसागर, वैभव वाघमारे, अजिंक्य खुणे, विशाल क्षीरसागर यांच्यासह समता परिषदेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मुलांमध्ये संशयित रुग्ण आढळल्यास त्वरित संपर्क साधा

## आरोग्य विभागाचे आवाहन

आरंभ मराठी / धाराशिव

लहान वयातील बालकांचे आरोग्य सुरळीत राहावे यासाठी लसीकरण हा एक प्रभावी उपाय असून, अनेक गंभीर आजारांपासून बालकांचे संरक्षण करण्यात लसीकरणाची महत्त्वाची भूमिका असते. याच अनुषंगाने जिल्हा आरोग्य विभागाने नागरिकांना जागरूक राहण्याचे आवाहन केले आहे. नवजात बालकांपासून ते १५ वर्षांपर्यंतच्या मुलांमध्ये होणारे विविध आजार लसीकरणामुळे टाळता येतात, हे लक्षात घेता प्रत्येक पालकाने आपल्या मुलांचे वेळेवर आणि पूर्ण लसीकरण करून घ्यावे,असेही आरोग्य विभागाने कळविले आहे. लसीकरणामुळे टाळता येणाऱ्या आजारांमध्ये ॲक्युट फ्लासिड पॅरालिसिस (), संशयित गोवर-रुबेला (-),संशयित घटसर्प (),संशयित डांग्या खोकला (), संशयित नवजात धनुर्वात ( ) यासारख्या आजारांचा समावेश होतो. या आजारांमुळे मुलांचे आरोग्य गंभीरपणे बाधित होऊ शकते, तर काही वेळा जीवघेणाही ठरू शकतो. त्यामुळे वेळेवर लस घेणे ही केवळ आरोग्याची काळजी घेण्याची नव्हे, तर एक सामाजिक जबाबदारीही आहे. जिल्हा आरोग्य विभागाकडून विविध माध्यमांतून जनजागृती केली जात असून, प्रत्येक पालकाने आपल्या भागातील सरकारी आरोग्य केंद्राशी संपर्क करून आपल्या मुलांचे लसीकरण संपूर्ण झाले आहे की नाही,याची खातरजमा करावी. यासाठी सरकारी रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, अंगणवाडी केंद्रे व आशा कार्यकर्त्यांमार्फत माहिती उपलब्ध करून दिली जात आहे. कुठल्याही आजाराची लक्षणे आढळल्यास किंवा संशयास्पद रुग्ण आढळल्यास तात्काळ जवळच्या सरकारी आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. वेळीच निदान व उपचार झाले, तर संसर्गजन्य रोगांचा प्रसार रोखता येऊ शकतो आणि मुलांचे आरोग्य वाचवता येते.यापैकी कोणतेही लक्षण आढळल्यास घाबरून न जाता त्वरित नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय किंवा जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, धाराशिव येथे संपर्क साधावा.अधिक माहितीसाठी फोन: 02472-227258 / 02473-221613 (NRHM) / 02472-320451 ((MC)),जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरीदास,जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ. कुलदीप मिटकरी यांनी केले आहे.

# दारफळ शाळेच्या शिक्षिका रंजना करडे यांना जिल्हा पुरस्कार प्रदान

आरंभ मराठी / धाराशिव

धाराशिव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दारफळ येथील शिक्षका रंजना बापूराव करडे यांचा जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने नुकताच सत्कार करण्यात आला. 'माझा वर्ग माझी जबाबदारी' अंतर्गत जिल्हा स्तरीय शिक्षक पुरस्कार त्यांना देण्यात आला. इयत्ता पहिलीच्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना भाषा, गणित, इंग्रजी विषयाची तयारी त्यांनी उत्कृष्ट करून घेतल्याबद्दल त्यांचा धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. श्रीमती करडे यांनी गेल्या तीन वर्षापासून इयत्ता पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये सुधारणा केली आहे. त्यांचे गटशिक्षणाधिकारी सय्यद असरार ,मुख्याध्यापक बिभीषण पाटील, सरपंच रवींद्र जाधव, अध्यक्ष भैरवनाथ जाधव, शिक्षक विजय पाटील, शिवाजी मरपळे, बाबू सावंत, प्रदीप बोरके, श्रीमती शशिकला कापसे, भाग्यश्री हुगे, चौरे आदींनी अभिनंदन केले आहे.




# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा बारावीचा निकाल ८५.१९ टक्के

आरंभ मराठी / तुळजापूर

बालाघाट शिक्षण संस्था संचलित तुळजापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल ८५.१९% लागला आहे. या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. महाविद्यालयातील एकूण सरासरी निकाल ८५.१९% असून विज्ञान शाखा ९५.४९%, वाणिज्य शाखा ९०.४७%, कला शाखा ७३.०७%,, एमसीव्हीसी शाखा ६४% असा निकाल लागला आहे. वाणिज्य शाखेमधून शिंदे अंकिता काशिनाथ ७५.५०% ही महाविद्यालयात प्रथम आली आहे. ननवरे प्रगती प्रकाश ७५% आणि शिंदे श्रद्धा सुधाकर ७१.१७% वाणिज्य शाखेतून अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय आल्या आहेत. विज्ञान शाखेमधून प्रथम पाटील ऐश्वर्या सोमेश्वर ७३.१७% , द्वितीय क्रमांक कुरुंद वैभवी हरी ६४% व तृतीय क्रमांक जाधव अक्षता अनंत ६३.६७% हे गुणवंत आहेत. कला शाखेमधून प्रथम क्रमांक अंजली शिवाजीराव वाघमारे ६३.५०%, द्वितीय क्रमांक देवकर धनश्री पांडुरंग ६३.३३% व तृतीय क्रमांक कु. जेटीथोर रमा गोरख ६३% , एमसीव्हीसी शाखेमधून प्रथम क्रमांक मुंडफने प्रियंका संजय ६८%, द्वितीय क्रमांक साखरे रोहन धनाजी ५६.३३% व तृतीय क्रमांक कोळेकर धनश्री संजय ५५.१७% असे अनुक्रमे गुणवंत आहेत. संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, संस्थेचे सचिव उल्हासदादा बोरगावकर, कार्याध्यक्ष रामदादा आलूरे, संचालक बाबुराव चव्हाण, प्राचार्य डॉ .मुकुंद गायकवाड, उपप्राचार्य डॉ. नरसिंग जाधव, कनिष्ठ महाविद्यालय उपप्राचार्य प्रा रमेश नन्नवरे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.



## महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती जयंती उत्सवात हरियाणातील कलाकारांचे प्रभावी सादरीकरण

# महाकालच्या अघोरी कलेचा भव्य देखावा; मुरूमकर झाले दंग





आरंभ मराठी / मुरुम

समतानायक महात्मा बसवण्णा यांच्या जयंतीनिमित्त मुरुम शहरात बुधवारी (दि.७) आयोजित केलेल्या मिरवणुकीत महाकाली देवीच्या अघोरी कलेचा देखावा शहरवासीयांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. महात्मा बसवेश्वर मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने भव्यदिव्य आणि उत्साही वातावरणात पार पडलेल्या या मिरवणुकीत हरियाणा येथून आलेल्या कलाकारांनी महाकाली देवीचे तांडव नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. या देखाव्यात महाकाली देवीचे विनाश आणि नवनिर्मिती यांचे प्रतीकात्मक सादरीकरण प्रभावीपणे करण्यात आले. अघोरी कलेच्या माध्यमातून देवीचे शक्तिशाली रूप, तांत्रिक मुद्रा आणि तांडव नृत्याचे सौंदर्य एकत्र सादर करत कलाकारांनी उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. इतिहास अभ्यासकांच्या मते, महाकाली हे काली देवीचे एक व्यापक आणि वैश्विक रूप असून, ती शक्ती, विनाश आणि निर्मितीचे प्रतीक मानली जाते. शिवावर उभी असलेली महाकाली ही आपल्या शक्तीवर नियंत्रण असलेल्या देवीचे रूप दर्शवते. मिरवणूक महात्मा बसवेश्वर चौक, सिद्धरामेश्वर मठ, अण्णाभाऊ साठे चौक, अशोक चौक, कुंभार विहीर, किसान चौक, सुभाष चौक, गांधी चौक मार्गे हनुमान चौक ते पुन्हा महात्मा बसवेश्वर चौक या मार्गावरून काढण्यात आली. या मिरवणुकीस उमरगा-लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांनी समतानायक महात्मा बसवण्णा यांच्या सिंहासन आरुढ मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच हरियाणातील कलाकारांनी सादर केलेल्या महाकालीच्या अघोरी कलेच्या देखाव्याचे कौतुकही केले. या मिरवणूक कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. पोलीस प्रशासन, नगर परिषद व महावितरण विभागाने मिरवणूक संपन्न होईपर्यंत उत्तम सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उत्सव समितीचे सर्वच पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.





# उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलचा दुहेरी गौरव



आरंभ मराठी /उमरगा

उमरगा आयएसओ मानांकित उमरगा जिल्हा परिषद हायस्कूलचा धाराशिव जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने पर्यावरणावर उत्कृष्ट काम करून मीयावाकी जंगल निर्मिती व वृक्ष संवर्धनाचे काम केल्याबद्दल गौरव करण्यात आला आहे. शाळेने गोवा आणि महाराष्ट्र राज्यातील पहिल्या १० शाळेत स्थान मिळवले आहे. तसेच मराठवाड्यातील अग्रेसर शाळा म्हणूनही शाळेचा लौकिक आहे. वर्षभरात राबवलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे उमरगा तालुक्यातील उत्कृष्ट शाळा म्हणून तसेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या योजनेअंतर्गत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांकाचे पाच लाख रुपयाचे बक्षीस, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन धाराशिव चे खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, शिक्षणाधिकारी प्रा. अशोक पाटील, शिक्षणाधिकारी सुधा साळुंके यांच्या हस्ते शाळेचा गौरव करण्यात आला. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, गटशिक्षणाधिकारी काकासाहेब साळुंके, केंद्रप्रमुख शिला मुदगडे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, धनराज तेलंग, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, संजय रुपाजी, सरिता उपासे, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील उपस्थित होते.